## नेट परीक्षेचा निकाल जाहीर; ५३,७६२ उमेदवार पात्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने (एनटीए) राष्ट्रीय पात्रता परीक्षेचा (यूजीसी-नेट) जाहीर केला. त्यात एकूण ८३ विषयांमध्ये ५३ हजार ७६२ उमेदवार सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत. तर ५ हजार ३२ उमेदवारांना सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र होण्यासह कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीही मिळाली आहे.

विद्यापीठांसह उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापकपदी नोकरी मिळविण्यासाठी एनटीएतर्फे यूजीसी नेट परीक्षा घेण्यात येते. ही परीक्षा ६ ते १४ डिसेंबर या कालावधीत, तसेच १९ डिसेंबर रोजी देशभरातील २९२ शहरांत घेण्यात आली. परीक्षेसाठी ९ लाख ४५ हजार ८७२ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यातील ६ लाख ९५ हजार ९२८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. एनटीएकडून या परीक्षेचा निकाल १० जानेवारीला जाहीर करण्यात येणार होता. मात्र मिचौंग चक्रीवादळामुळे काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नव्हती. त्या विद्यार्थ्यांसाठी पुन्हा परीक्षा घेण्यात आली. त्यामुळे निकाल पुढे ढकलण्यात आल्याचे एनडीएकडून जाहीर करण्यात आले होते.

## बंदुकीच्या धाकाने दागिने लुटले

**मुंबई :** सांताक्रुझ पूर्वेकडील घरात शिरलेल्या तिघांनी बंदुकीच्या धाकावर ३१ लाखांचे दागिने लुटल्याचा प्रकार शुक्रवारी घडला. आरोपींच्या मारहाणीत दाम्पत्य जखमी झाले असून याप्रकरणी वाकोला पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला. तसेच दोघांना अटक केली असून तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

तक्रारदार सराफ व्यावसायिक असून त्याची पश्चिम उपनगरात पेढी आहे. ते वाकोला पोलिसांच्या हद्दीत राहतात. शुक्रवारी सकाळी सुमारास तक्रारदाराच्या घरी आलेल्या आरोपींनी बंदुकीच्या धाकाने त्यांच्या घरातील सुमारे अर्धाकिलो सोन्याचे दागिने घेऊन पळ काढला. यावेळी त्यांनी दाम्पत्याला माहराण केली.

# वाढवण बंदराची जनसुनावणी गुंडाळली

### हरकती, सूचना पर्यावरण विभागाला पाठवणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** वाढवण येथे देशातील सर्वात मोठे बंदर उभारण्यासाठी जाहीर जनसुनावणीचा सोपस्कार राज्य सरकारने पूर्ण केला. या सुनावणीदरम्यान उपस्थित केलेले विविध मुद्दे तसेच प्राप्त झालेल्या ई-मेल, निवेदन व पत्राद्वारे हरकती व सूचना यांची इतिवृत्तामध्ये नोंद करून पर्यावरण विभागाकडे पाठवण्यात येणार आहेत. साडेपाच तासांपेक्षा अधिक कार्यकाळ सुरू असलेली सुनावणी अखेर गुंडाळण्यात आली.

वाढवण येथे बंदर उभारण्यासाठी पर्यावरणविषयी जाहीर जनसुनावणीचे आयोजन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी अडीच हजारपेक्षा अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात केले होते.

### ‘लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवा’

**जनसुनावणीमध्ये मच्छीमार नेत्यांसह अनेक नागरिकांनी हरकती नोंदवून या विनाशकारी प्रकल्पामुळे मच्छीमार, शेतकरी तसेच आदिवासी बांधव उद्धवस्त होईल, असे सांगत या बंदरासंदर्भात केलेले अभ्यास परिपूर्ण नसल्याचे सांगितले. अनेक आक्षेपांबाबत सुनावणीदरम्यान नोंद केल्याचे सांगत त्याची इतिवृत्तात नोंद केली जाईल, असे आश्वासित करण्यात आले. सायंकाळी ४.४५ च्या सुमारास अनेक उपस्थितांना तांत्रिक मुद्दे मांडायचे असल्याचे सांगितले जात असतानाच सुनावणी बराच काळ सुरू राहिल्याचे सांगत तांत्रिक मुद्द्यांवर लेखी स्वरूपात आक्षेप घ्यावेत, असे सांगत जिल्हाधिकारी यांनी जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.**

या जनसुनावणीच्या अनुषंगाने नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या तांत्रिक अहवालाचे मराठीमध्ये अनुवाद सदोष असल्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आला. तसेच अनेक आवश्यक पर्यावरणीय अभ्यास केले गेले नसल्याचे व केलेल्या अभ्यासांपैकी महत्त्वपूर्ण अभ्यास अपूर्ण असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. त्यामुळे जनसुनावणी स्थगित करण्याची जोरदार मागणी बंदरविरोधी संघर्ष समिती, मच्छीमार संघटना, आमदार विनोद निकोले, आमदार सुनील भुसारा, शिवसेनेच्या उपनेत्या ज्योती मेहर व जिल्हाप्रमुख कुंदन संखे आदींनी केली. मात्र जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भात ‘जेएनपीए’ने मांडलेली भूमिकेबाबत पर्यावरण विभाग निर्णय घेईल असे सांगून जनसुनावणी पुढे रेटून नेली.

यावेळी प्रकल्पाला समर्थन करण्याच्या उद्देशाने भाजपचे नेते, पदाधिकारी यांच्यासह उत्तर भारतीय महिला सुनावणी सुरू होण्यापूर्वी सभामंडपात दाखल झाल्या. मात्र मच्छीमारांनी हरकत घेऊन आक्रोश केल्याने त्यापैकी अनेकांनी सुनावणीमधून नंतर निघून जाणे पसंत केले.

# चेहऱ्याच्या ओळखपट्टीच्या आधारे ‘मनरेगा’ची हजेरी

### केंद्र सरकारकडून नवीन प्रणाली विकसित

**अशोक अडसूळ, लोकसत्ता**

**मुंबई :** राज्यात २१ लाख कुटुंबांच्या मजुरीचा स्त्रोत ठरलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची (मनरेगा) हजेरी यापुढे फेसरिडींगद्वारे (चेहरा ओळख) नोंदली जाणार आहे. यंत्राद्वारे कामे केली जाऊ नयेत यासाठी केंद्र सरकारने अचूक हजेरीची नवी प्रणाली विकसित केली असून राज्याच्या रोजगार हमी योजना विभागासमोर त्यासंदर्भात सादरीकरण पार पडले आहे.

‘रोहयो’ मजुरांची हजेरी अचूक नोंदली जाऊन त्यांना जलदगतीने मजुरी मिळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक हजेरी पत्रक (ई-मस्टर) वापरण्यात येते. मजुरांच्या बँक आणि पोस्टातील खात्यात केंद्राकडून थेट मजुरी जमा केली जाते. या खात्यांना १ जानेवारीपासून आधार नोंदणी सक्तीची केली आहे. राज्यात १ कोटी ३० लाख जॉब कार्ड आहेत. पैकी ६७ लाख ९२ हजार सक्रिय असून त्यातील २ लाख ३४ हजार जॉब कार्डना अद्याप आधार संलग्नीकरण नाही. २०२२-२३ मध्ये राज्यात ‘मनरेगा’वर २ हजार ९९१ कोटी रुपये खर्च झाले असून ३७ लाख मजुरांनी साडेतीन लाख कामे निर्माण केली आहेत.

मजुरांऐवजी यंत्राद्वारे ‘मनरेगा’ची कामे केली जातात, असा केंद्र सरकारचा आरोप आहे. त्यामुळे मजुरी घेणारा मजूर प्रत्यक्ष कामावर होता की नाही यासाठी हजेरीची नवी पद्धती आणली आहे. मोबाईलमधील ॲपद्वारे ‘फेसरिडींग’ची हजेरी नोंदली जाणार आहे. चेहरा स्कॅन केला की आधार क्रमांकासह मजुराच्या बँक खात्याची माहिती समजणार आहे.

# कोकण मंडळाच्या २५ हजार अर्जदारांची प्रतीक्षा संपणार?

### ५,३११ घरांसाठी २६ जानेवारी रोजी सोडत?, मुख्यमंत्र्यांची वेळ मिळताच अधिकृत घोषणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** मागील महिनाभरापासून म्हाडाच्या कोकण मंडळाच्या ५३११ घरांच्या सोडतीसाठीच्या २५ हजार अर्जदारांची सोडतीची प्रतीक्षा अखेर आता संपणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रजासत्ताक दिनी, २६ जानेवारीला सोडतीसाठी वेळ देण्याचे आश्वासित केले आहे. त्यानुसार २६ जानेवारीला सोडत काढण्याच्यादृष्टीने कोकण मंडळ सोडतीच्या तयारीला लागले आहे. मात्र मुख्यमंत्र्यांची वेळ निश्चित झाल्यानंतरच म्हाडाकडून सोडतीची घोषणा होणार आहे.

कोकण मंडळाकडून सप्टेंबरमध्ये ५३११ घरांसाठी जाहिरात प्रसिद्ध करत अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. मूळ वेळापत्रकानुसार ७ जानेवारीला सोडत काढण्यात येणार होती. मात्र, अर्जविक्री-स्वीकृतीला प्रतिसाद न मिळाल्याने ही सोडत पुढे ढकलत कोकण मंडळाने अर्जविक्री-स्वीकृतीला मुदतवाढ दिली. मुदतवाढीनुसार सोडतीची तारीख १३ डिसेंबर अशी जाहीर करण्यात आली. अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया संपुष्टात आली. पात्र अर्जदारांची यादी जाहीर करण्यात आली. मात्र १३ डिसेंबरला अधिवेशन असणार असल्याने आणि मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सोडत काढायची असल्याने म्हाडाने डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात १३ डिसेंबरची सोडतही पुढे ढकलली. ही सोडत पुढे ढकलतानाच म्हाडाने लवकरच सोडतीची नवीन तारीख जाहीर करू असे जाहीर केले. मात्र, कोकण मंडळाकडून तारीख काही जाहीरच होत नव्हती. त्यामुळे अर्जदारांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली. समाज माध्यमातून त्यांनी सोडत जाहीर करण्याची मागणी करत म्हाडाच्या कारभारावर टीकाही केली. या पार्श्वभूमीवर अखेर म्हाडाने मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करत सोडतीसाठी वेळ मागितली. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी २६ जानेवारीची वेळ देण्याचे म्हाडाला आश्वासित केल्याची माहिती म्हाडातील सूत्रांनी दिली. या अनुषंगाने २६ जानेवारीला सोडत काढण्यात येणार असल्याचे निश्चित झाले आहे. मुख्यमंत्र्यांची वेळ अधिकृतपणे निश्चित झाल्यास म्हाडाकडून सोडतीची तारीख जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

### जागेचा शोध

कोकण मंडळ मात्र २६ जानेवारीच्या अनुषंगाने तयारीला लागले आहे. जागेचा शोध आणि इतर कामांना वेग आला आहे. सोडत म्हाडा भवनात करायची की रंगशारदा सभागृहात वा ठाण्यात यावरही विचार सुरू असून लवकरच याचाही निर्णय अंतिम होण्याची शक्यता आहे. एकूणच २६ जानेवारीला सोडत काढण्याचे आता जवळपास निश्चित झाल्याने विरार-बोळींज योजनेसाठीचे अंदाजे ७५० आणि इतर योजनेसाठीचे २४ हजार ३०३ पात्र अर्जदारांची सोडतीची प्रतीक्षा आता संपणार आहे.


## मंगलम ड्रग्स अँड ऑर्गेनिक्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** रुपम बिल्डिंग, ३रा मजला, २३९, पी. डी. मेलो रोड, जीपीओ च्या जवळ, मुंबई - ४०० ००१. **दूरध्वनी क्र. :** -१ - ०२२ -२२६१६२०० /६३०० / ८७८७ **फॅक्स :** ९१-२२- २६१९०९०

CIN - L24230MH1972PLC116413

**३० सप्टेंबर २०२३ रोजी संपलेल्या कालावधीसाठी एकत्रीकृत अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष**

(₹ लाखांत)

| Particulars | तिमाही | | | अर्धवार्षिक | | वर्ष संपलेले |
|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाही संपलेले ३०/०९/२०२३ | मागील तिमाही संपलेले ३०/०६/२०२३ | संबंधित तिमाही संपलेले ३०/०९/२०२२ | अर्धवार्षिक संपलेले ३०/०९/२०२३ | संबंधित अर्धवार्षिक संपलेले ३०/०९/२०२२ | वर्ष संपलेले ३१/०३/२०२३ |
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित |
| कामकाजातून उत्पन्न | - | - | - | १६९०२.३६ | - | - |
| कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (कर अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबीपुर्वी) | - | - | - | (१५०४.३६) | - | - |
| कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा / (तोटा) (कर अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर) | - | - | - | (१५०४.३६) | - | - |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर) | - | - | - | (१३०९.९७) | - | - |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा / तोटा (करोत्तर) आणि सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून | - | - | - | (१३०३.७३) | - | - |
| समभाग भांडवल | १५८२.८२ | १५८२.८२ | १५८२.८२ | १५८२.८२ | १५८२.८२ | १५८२.८२ |
| राखीव निधी (पुनर्मुल्यांकनराखीव निधी वगळून) | - | - | - | - | - | - |
| प्रति समभाग मिळकत (प्रत्येकी रु १०) चालू आणि बंद कार्यरतसाठी | | | | | | |
| मूळ प्रतिभाग | - | - | - | (८.२८) | - | - |
| मिश्रित प्रतिभाग | - | - | - | (८.२८) | - | - |

टीप:

वरील तपशील हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ऍण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियमावली ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेस सोबत दाखल करण्यात आलेल्या, ३० सप्टेंबर २०२३ रोजी संपलेल्या कालावधी साठी एकत्रीकृत अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्षाचा संक्षिप्त उतारा आहे. ३० सप्टेंबर २०२३ रोजी संपलेल्या कालावधी साठी एकत्रीकृत अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्षाचा संपूर्ण अहवाल स्टॉक एक्सचेंजेसची वेबसाईट (www.bseindia.com व www.nseindia.com आणि कंपनीच्या वेबसाईट www.mangalamdrugs.com) येथे उपलब्ध आहे.

मंडळाचे आदेशानुसार
**मंगलम ड्रग्स अँड ऑर्गेनिक्स लिमिटेड करिता**
सही/-
श्री. गोवर्धन एम. धूत
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०१२४००८६

स्थळ : मुंबई
दिनांक : ०८ नोव्हेंबर २०२३



## SBI

नेटवर्किंग व कम्युनिकेशन विभाग, भारतीय स्टेट बँक, ग्लोबल आयटी- सेंटर सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

**शुध्दीपत्रक-४**

कृपया भारतीय स्टेट बँकेच्या ७००० शाखा आणि ४ डेटा केंद्रांसाठी सॉफ्टवेअर डिफाइंड WAN (SDWAN) सोल्यूशनच्या खरेदीसाठी दि. २२.११.२०२३ रोजीचे आरएफपी क्र. SBI/GITC/NW&C/२०२३-२४/१०६५ पहावे. दिनांक १८.०१.२०२४ रोजीचे शुध्दीपत्रक - ४ बँकेच्या **https://www.sbi.co.in** किंवा **https://bank.sbi** वेबसाईटवर प्रोक्युअरमेंट न्यूज विभागांतर्गत किंवा ई प्रोक्युअरमेंट एजन्सीच्या **https://etender.sbi/SBI/** या पोर्टलवर पहाता येऊ शकेल.

स्थान: नवी मुंबई
दिनांक: २०.०१.२०२४

स्वाक्षरी/- उप महाप्रबंधक
(नेटवर्किंग आणि कम्युनिकेशन विभाग)



## नोटीस
## टाटा मोटर्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय - टाटा मोटर्स लिमिटेड, चौथा मजला, अहुरा सेंटर, 82 महाकाली लेणी रोड, MIDC-अंधेरी पूर्व, मुंबई 400093, फोन नंबर +91-22-62407101

याद्वारे सूचना देण्यात येत आहे, की कंपनीच्या खाली नमुद केलेल्या सिक्युरिटीजची प्रमाणपत्रे गहाळ झाली आहेत आणि उक्त सिक्युरिटीजने कंपनीकडे डुप्लिकेट प्रमाणपत्रे जारी करण्पासाठी अर्ज केला आहे. उक्त सिक्युरिटीजच्या संदर्भात दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने या तारखेपासून 15 दिवसांच्या आत कंपनीकडे नोंदणीकृत कार्यालयात असा दावा दाखल करावा, अन्यथा कंपनी पुढील सूचना न देता डुप्लिकेट प्रमाणपत्रे जारी करण्यास पुढे जाईल.

| धारकाचे नाव (आणि संयुक्त धारक असल्यास) | सिक्युरिटीजचा प्रकार आणि दर्शनी मूल्य | सिक्युरिटीजची संख्या | डिस्टींगटीव्ह नंबर |
|---|---|---|---|
| प्रल्हाद बाबुराव पाटील | शेअर सर्टिफिकेट रु. 2/- (प्रत्येक) | 480 | 30018586 ते 30019065 |

ठिकाण - जयसिंगपूर
दिनांक - 19/12/2023

अर्जदाराचे नाव -
अनिल प्रल्हाद पाटील



## अध्यासी अधिकारी
## भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे.

दिनांक. १८/०१/२०२४

**-: सभा नोटीस :-**

**भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे** या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण गट या प्रवर्गातील / मतदार संघातील संचालक / संचालकांच्या निवडीकरीता **अध्यासी अधिकारी** यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक २९/०१/२०२४ रोजी, वार सोमवार, सकाळी १०.४५ वाजता भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे, निवेदिता भवन, प्रभात रोड, लेन नं. ०८, एरंडवणा, पुणे** यांचे मुख्य कार्यालय या ठिकाणी संचालकमंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, सर्व संचालकांनी संचालकमंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत **नैमित्तीक रिक्त झालेली पदे** निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्र वाटप व स्विकृती | सकाळी ११.०० ते ११.१५ |
| २. | नामनिर्देशन पत्र छाननी | सकाळी ११.१५ ते ११.३० |
| ३. | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्धी | सकाळी ११.३० ते ११.४५ |
| ४. | नामनिर्देशन पत्र माघार | सकाळी ११.४५ ते १२.०० |
| ५. | अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे | दुपारी १२.०० |
| ६. | मतदान प्रक्रिया | दुपारी १२.०० ते १२.३० |
| ७. | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी १२.३० ते १२.४५ |
| ८. | निवडुन आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे. | दुपारी १२.४५ |

टिप : निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

सही/-
(प्रगती वाबळे,
अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)
दि. १८/०१/२०२४.
ठिकाण : पुणे.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे



## IDBI BANK

CIN: L65190MH2004GOI148838

**आयडीबीआय बँक लि.** रिटेल रिकव्हरी डिपार्टमेंट, भूमिराज कोस्टारिका, मोराज रेसिडन्सीजवळ, पाम बीच (सर्व्हिस) रोड, सानपाडा, सेक्टर १८, नवी मुंबई, पिन-४००७०५ टेलि. क्र. ०२२-२७८१०३१४

**ताबा सूचना**

निम्नस्वाक्षरीकार हे आयडीबीआय बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत मागणी सूचना पाठवली ज्यात कर्जदारांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत सदर सूचनेत नमूद रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार व सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील नियम १३ मधील उप-विभाग (४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद (१३) मधील उप-विभाग (८) मधील तरतुदीकडे वेधण्यात येते.

**याद्वारे कर्जदार व सर्व लोकांना सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो आयडीबीआय बँक लिमिटेडच्या खाली नमूद रकमेच्या आणि तीवरील व्याज व शुल्कांच्या भाराधीन असेल.**

| कर्जदार / मालमत्तेचे मालक / जामीनदाराचे नाव आणि कर्ज खाते क्र. | मागणी सूचनेचा दिनांक | ताब्याचा दिनांक | मागणी सूचनेत मागणी केलेली रक्कम | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| श्री गंगाधर बापू पांडव आणि श्री लक्ष्मण बापू पांडव आणि श्रीमती रुपाली पांडव कर्ज खाते क्र. १७१०६७५१०००००३८३ | १०.०७.२३ | १६.०१.२०२४ | रु. ९७५९०८.१७/- (रुपये सात लक्ष पंच्याहत्तर हजार नऊशे आठ आणि सतरा पैसे फक्त) | दुकान क्र. २०, सिद्धी विनायक वास्तू सीएचएसएल, तळ मजला, मालमत्ता क्र. २३५३/२०, स.क्र. १६४/३, पाळी सुधागड, पाली, महा-४१०२०५. |
| श्री अजय जगन्नाथ खंडागळे आणि श्रीमती सारिका अजय खंडागळे कर्ज खाते क्र. ०२९९६७५१०००१३९३४, ०२९९६७५१०००१४१२८ | ०८.०८.२३ | १७.०१.२०२४ | रु. १६७८९४८/- (रुपये सोळा लक्ष अठ्ठयाहत्तर हजार नऊशे अठ्ठेचाळीस फक्त) | एकतानगर, सदनिका सी विंग ०६, चेंधारे, अलिबाग, महाराष्ट्र-४०२२०१ |
| श्री सतेज चंद्रकांत आपणकर आणि श्रीमती सलोनी सतेज आपणकर कर्ज खाते क्र. १५९७६७५१००००५०५० | ०८.०८.२३ | १८.०१.२०२४ | रु. ५७२९२०३.१३/- (रुपये सत्तावन्न लक्ष एकोणतीस हजार दोनशे तीन आणि तेरा पैसे फक्त) | **१.** दुकान क्र. २, तळ मजला, साई स्वामी अपार्टमेंट, सीटीएस क्र. ७३७, रोहा, महाराष्ट्र - ४०२१०९. **२.** सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, मंगलम अपार्टमेंट, तालुका रोहा, रायगड, महा-४०२१०९ |
| श्री दाऊद लियाकत सय्यद, कर्ज खाते क्र. ०८९९६५११०००००१३४ | ०८.०८.२३ | १९.०१.२०२४ | रु. १४५९४९.५६/- (रुपये एक लक्ष पंचेचाळीस हजार नऊशे एकोणपन्नास आणि छप्पन्न पैसे फक्त) | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, ए-विंग, अल-हादी अपार्टमेंट, सर्व्हे क्र. १, सी१/४+६बी, प्लॉट क्र. ४, सम्राटनगर, नेरळ कर्जत रोड, नेरळ, कर्जत, महाराष्ट्र - ४००६०१. |

दिनांक : २०.०१.२०२४
ठिकाण : नवी मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी, आयडीबीआय बँक लि.



Choice The Joy of Earning

Choice FinX

## जाहिर सूचना

### महत्वपूर्ण सूचना:

**चॉईस किंवा त्याचे सहयोगी असल्याचा दावा करणाऱ्या फसव्या धोकेबाजांपासून सावध रहा**

तुम्हा सर्वांना ह्याद्वारे काळविण्यात येत आहे की आमचे अधिकृत संकेतस्थळ **www.choiceindia.com** आहे. आम्ही अशी उदाहरणे पाहिली आहेत जिथे अनाधिकृत व्यक्ती/व्यवसाय चॉईसशी संबंधित असल्याचा किंवा त्याचे प्रतिनिधित्व करत असल्याचा खोटा दावा करत आहेत. कृपया लक्षात घ्या की आमच्या अधिकृत वेबसाइट डोमेनशिवाय संबंधित असल्याचा दावा करणारी किंवा तत्सम नाव/लोगो वापरणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यवसाय आमच्याशी संबंधित नाही.

कोणत्याही तृतीय व्यक्तीच्या बँक खात्यात पैसे देऊ नका. जर बँक खाते **चॉईस इक्विटी ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या नावावर असेल तरच आमच्या सेवांसाठी पेमेंट केले जावे** आणि तुम्ही वरीलप्रमाणे आमच्या अधिकृत वेबसाइटवरून बँक तपशील सत्यापित करू शकता.

आम्ही सचोटी आणि पारदर्शकतेची सर्वोच्च मानके राखण्यासाठी वचनबद्ध आहोत आणि आम्ही आमच्या ग्राहकांना आणि जनतेला सावधगिरी बाळगण्याचे आणि चॉईसशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही धोकेबाजांना सत्यता पडताळण्याचे आवाहन करतो. कृपया अशा फसव्या धोकेबाजांना बळी पडू नका.

चॉइस इक्विटी ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेड करीता
सही/-
(प्रशांत सॅलियन)
अनुपालन अधिकारी

जानेवारी १९, २०२४
मुंबई

**चॉइस इक्विटी ब्रोकिंग प्राइवेट लिमिटेड**
सुनील पटोदिया टॉवर, जे. बी. नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००९९
ईमेल आईडी: customercare@choiceindia.com • संपर्क नंबर: +९१-८८२४२४२४२४



## Reliance Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशिल | संपलेले तिमाही ३१ डिसेंबर, २०२३ | संपलेले नऊ महिने ३१ डिसेंबर, २०२३ | संपलेले तिमाही ३१ डिसेंबर, २०२२ |
|---|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | २४८,१६० | ७३५,२८८ | २४०,५३२ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | २०,१९० | ६१,५३१ | २०,३६७ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **२२७,९७०** | **६७३,७५७** | **२२०,१६५** |
| सुरु असलेल्या कामकाजासाठी करपूर्व नफा | २५,९८६ | ७६,९०७ | २२,९०२ |
| **सुरु असलेल्या कामकाजासाठी करपश्चात नफा** | **१९,६४१** | **५७,७७७** | **१७,७०६** |
| बंद केलेल्या कामकाजातील नफा (कर वगळता) | - | - | १०० |
| **कालावधीसाठी नफा** | **१९,६४१** | **५७,७७७** | **१७,८०६** |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर वगळता)* | २०,०९१ | ५८,४४३ | २२,२८७ |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी दर्शनी मूल्य ₹१०/- मूल्याचा | ६,७६६ | ६,७६६ | ६,७६६ |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी** | - | - | - |
| **प्रति इक्विटी समभाग मिळकत (₹ मध्ये) (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रत्येकी)** | | | |
| **सुरू असलेले कामकाज** | | | |
| मूळ (₹ मध्ये) | २५.५२ | ७४.९० | २३.१९ |
| सौम्य (₹ मध्ये) | २५.५२ | ७४.९० | २३.१९ |
| **बंद केलेले कामकाज** | | | |
| मूळ (₹ मध्ये) | - | - | ०.१५ |
| सौम्य (₹ मध्ये) | - | - | ०.१५ |
| **सुरू आणि बंद केलेले कामकाज** | | | |
| मूळ (₹ मध्ये) | २५.५२ | ७४.९० | २३.३४ |
| सौम्य (₹ मध्ये) | २५.५२ | ७४.९० | २३.३४ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट

**३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा पुर्नमूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹ ७०९,१०६ कोटी.

टिपा:

१. १९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.

२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे.

(₹ कोटीत)

| तपशिल | संपलेले तिमाही ३१ डिसेंबर, २०२३ | संपलेले नऊ महिने ३१ डिसेंबर, २०२३ | संपलेले तिमाही ३१ डिसेंबर, २०२२ |
|---|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १३६,०८३ | ४१५,६५० | १३४,७९९ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ५,५०४ | १८,७२२ | ५,५२२ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१३०,५७९** | **३९६,९२८** | **१२९,२७७** |
| सुरु असलेल्या कामकाजासाठी करपूर्व नफा | १२,९७८ | ४०,२२२ | ११,६०० |
| **सुरु असलेल्या कामकाजासाठी करपश्चात नफा** | **९,९२४** | **३०,७५९** | **८,२६३** |
| बंद केलेल्या कामकाजातील नफा (कर वगळता) | - | - | ११० |
| **कालावधीसाठी नफा** | **९,९२४** | **३०,७५९** | **८,३७३** |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर वगळता) | १०,०८३ | ३०,३५१ | ६,६६० |

३. ३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आला आहे व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.

३१ डिसेंबर, २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **(www.ril.com)** येथे उपलब्ध आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : १९ जानेवारी, २०२४

www.ril.com